।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४१

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला * जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे * रविवार दि.१ सप्टेंबर २०२४ * पाने ४ * मूल्य १ ₹ * अंक ३३ वा

## छ.शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ बैठक आयोजित करावी

### माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांची लेखी निवेदनाद्वारे मागणी



सांगोला : सांगोला शहरात छत्रपती शिवाजी चौक सांगोला येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाक्ती पुतळ्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. अनेक वर्षांपासून तालुक्यातील सबंध शिवप्रेमींची उत्सुकता लागून राहिलेल्या छत्रपती शिवरायांचा पुतळा शहरात लवकरात लवकर उभा रहावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ बैठक आयोजित करावी अशी मागणी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सांगोला शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या चबुतऱ्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच याबाबतचे अन्य महत्त्वपूर्ण कामही पूर्ण झाले आहे. सांगोला शहरात छत्रपती शिवाजी चौक सांगोला येथे शिवरायांचा पुतळा लवकरात लवकर बसावा ही शिवप्रेमी बहुउद्देशीय सामाजिक संस्था सांगोला यांच्या प्रमुख पदाधिकारी आणि शिवप्रेमी जनतेची आग्रही मागणी आहे.

याबाबत मंजुरीसाठी विहित नमुन्यात प्रस्तावही संबंधित प्रशासनाकडे दाखल केले आहेत. सांगोला शहरात छ. शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारावा ही सबंध तालुक्यातील शिवप्रेमी नागरिकांची अनेक वर्षांची मागणी आहे. याबाबत शिवप्रेमी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने पुढाकार घेऊन एक सामाजिक चळवळ उभा केली आणि याद्वारे सदरचा पुतळा उभा करण्याच्या सर्व प्रक्रिया पार पाडल्या.

शहरात छत्रपती शिवरायांचा पुतळा लवकरात लवकर उभा राहावा ही सबंध तालुक्यातील समाज बांधवांची आग्रहाची मागणी आहे. तालुक्यातील जनतेच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांनीच पुढाकार घेऊन लवकरात लवकर बैठक आयोजित करावी आणि छत्रपती शिवरायांचा पुतळा उभा करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या तात्काळ द्याव्या अशी मागणी शेवटी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी आपल्या निवेदनाद्वारे केली आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी पुतळा उभारणीसाठी मंजुरी देण्याची कार्यवाही तात्काळ करावी-आ.शहाजीबापू पाटील

### छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा लवकरच उभारणार



सांगोला : सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या चबुतऱ्यांचे काम पूर्णत्वाकडे सुरू आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्यदिव्य पुतळा उभारण्यासाठी माझ्यासह शिवप्रेमी बहुउद्देशीय सामाजिक संस्था सांगोला व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ सांगोला यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह संबंधीत सर्व शासकीय अधिकारी यांची पुतळा समितीची बैठक तातडीने आयोजीत करावी. तसेच पुतळा उभारणीसाठी मंजुरी देण्याची कार्यवाही तात्काळ करावी, अशा सूचना आमदार शहाजीबापू पाटील यांनी पत्राद्वारे व दूरध्वनीवरून जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्या आहेत.

सांगोला शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक सांगोला येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकती पुतळ्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. तसेच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या चबुतऱ्यांचे काम पूर्णत्वाकडे सुरू आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्यदिव्य पुतळा लवकरात लवकर उभा रहावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ पुतळा समितीची बैठक आयोजित करावी. तसेच पुतळा उभारणीसाठी मंजुरी देण्याची कार्यवाही तात्काळ करावी अशा सूचना आमदार शहाजीबापू पाटील यांनी पत्राद्वारे व दूरध्वनीवरून जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्या आहेत.

दोन्ही संस्थांकडून नवीन पुर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी संपूर्ण परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला आहे. त्यामुळे सदर पुतळा समितीच्या बैठकीला माझ्यासह शिवप्रेमी बहुउद्देशीय सामाजिक संस्था सांगोला व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ सांगोला यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह संबंधीत सर्व शासकीय अधिकारी यांना आमंत्रित करावे अशा सूचना आमदार शहाजीबापू पाटील यांनी पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत.

## गुरुमाऊली पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

सांगोला : गुरुमाऊली नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सांगोला या पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन श्री मारुती आबा बनकर यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. प्रास्ताविक भाषणात श्री.सुर्यकांत दौडे सर यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा वाचून दाखवला. सर्व उपस्थितांचे स्वागत श्री.भीमराव फुले सर यांनी केले. अहवाल वाचन संस्थेचे चेअरमन श्री.मारूतीआबा बनकर यांनी केले. विषय पत्रिकेवरील विषयाचे वाचन संस्थेचे व्यवस्थापक श्री.दत्तात्रय राऊत यांनी केले.

सन २०२३-२४ अखेर संस्थेकडे एकूण ठेवी ३३ कोटी, वसूल भाग भांडवल २ कोटी ४७ लाख, निधी ८ कोटी १ लाख, कर्ज ३४ कोटी ६९ लाख, गुंतवणूक ८ कोटी २७ लाख, नफा १ कोटी ९५ लाख झाला असून सभासदांना १२ टक्के लाभांश व दिवाळी भेट म्हणून १० किलो साखर, २ किलो तेल, २ किलो हरभरा डाळ, पॅराशुट बाटली १, संतूर साबण व उटणे वाटप करण्याचे ठरले. सभेमध्ये दरमहा रेग्युलर हप्ता भरणाऱ्या ५० सभासदांनी संस्थेस भरघोस व्याज मिळवून दिले म्हणून संस्थेने मागील सन २०२२- २३ सालापासून कर्जदार सभासदांना २% रिबेट देण्यात आले. एकूण मिळालेले व्याज ४३ लाख २५ हजार ९८३ , त्यावर रिबेट ५ लाख ७६ हजार ७९७ एवढी रिबेट देण्यात आले.




सभेस सहाय्यक निबंधक श्री.पी.आर.नालवार, श्री.घोडके, श्री.गोसावी, श्री.पुजारी, श्री.शेख यांच्यासह वैधानीक लेखापरीक्षक सी ए उत्तम डी बनकर, अंतर्गत लेखा परीक्षक ए.एस.खटावकर, पंढरपूर बँकेचे माजी व्यवस्थापक धनंजय शेंडे, सेवानिवृत्त शासकीय लेखापरीक्षक श्री.तांबोळी, श्री.शिवाजी (नाना) बनकर, ॲड.तुकाराम ढेरे, लक्ष्मण माळी, विजय राऊत, रामचंद्र बनकर, सुरेश माळी, श्री.पतंगे यांच्यासह चेअरमन, व्हा.चेअरमन, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी, सभासद वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय......

जुने वर्ष-४१ वे
अंक-४० वा

## वेक-अप कॉल,भारतीय लोकशाहीचा विजय

या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या २०२४ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकांनी अनेक लेबले जमा केली, सर्व बदलाची समान थीम सामायिक करतात.गेल्या दोन टर्ममध्ये पूर्ण बहुमत मिळविल्यानंतर, यावेळी भाजपला मोठा धक्का बसला, त्यांना त्यांचे सरकार स्थापन करण्यासाठी दोन महत्त्वाच्या मित्रपक्षांवर अवलंबून राहावे लागले - या मोदी सरकारचे किंगमेकर नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू.निर्विवाद विजयाची सवय झालेल्या पक्षाला आणि त्याच्या अजिंक्य दिसणाऱ्या नेत्याला शेवटी त्यांच्या राजकीय सामर्थ्यावर नियंत्रणाचा अनुभव आला - एक गंभीरपणे पादचारी मोदींना शिक्षा आणि भारताच्या लोकशाही संरचनेसाठी योग्य दिशेने एक पाऊल.मोदींनी ऐतिहासिक तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली असतानाच, हा काहीसा अस्पष्ट विजय होता, कारण भाजप आता नितीश आणि नायडू यांच्या कृपेवर असल्याचे दिसत आहे.

या निकालाने आपल्या लोकशाहीच्या नूतनीकरणाच्या बळावर देशातील बहुतेक ठिकाणी आशेचे संकेत दिले असले तरी, अनेक राजकीय विश्लेषकांनी नगण्य वास्तविक बदलाचा अंदाज वर्तवला, जर असेल तर, आणि त्याऐवजी भाजपच्या अथक उपासमारीला देशातील एकमेव राजकीय अधिकार म्हणून पुनरुज्जीवित होण्याची भविष्यवाणी केली.पूर्ण बहुमत मिळविण्यात भाजप जरी कमी पडला असला तरी, तरीही त्यांनी २४० जागांसह चमक दाखवली, तर काँग्रेस ९९ जागांसह खूप मागे आहे. ही निवडणूक २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालांच्या तुलनेत लक्षणीय सुधारणा दर्शवते, परंतु एकाकीपणाने, भारतीय राजकारणावर भाजपच्या घुसखोरीचे प्रतीक म्हणून याकडे पाहिले जात होते - एक पकड जी आता ढिली झाली असेल, परंतु अजूनही अस्तित्वात आहे.तथापि, गेल्या दोन महिन्यांत मोदी सरकारने घेतलेल्या यू-टर्न आणि बदलांमुळे या अपेक्षा धुडकावल्या जातात, ज्यामुळे युतीच्या राजकारणाचे पुनरुत्थान सूचित होते. या यू-टर्नमध्ये अचानक धोरणात्मक बदल आहेत, जे सूचित करतात की भाजप, पूर्वीचे वर्चस्व असूनही, आता त्याच्या युती भागीदारांच्या मागण्या पूर्ण करण्यास भाग पाडत आहे. केंद्रीय प्राधिकरणाच्या या कमकुवतपणाचा परिणाम म्हणून, मोदी सरकारला एकतर्फी निर्णय घेण्यापेक्षा सहमती निर्माण करण्याला प्राधान्य देण्यास भाग पाडले जात आहे, जे त्याच्या पूर्वीच्या शासन शैलीपासून महत्त्वपूर्ण प्रस्थान दर्शवते.धोरणातील सर्वात अलीकडील बदल २० ऑगस्ट रोजी झाला, जेव्हा मोदी ३.० सरकारने भारत आघाडी तसेच नितीश आणि नायडू यांच्या टीकेनंतर युपीएससी द्वारे पार्श्व प्रवेश नियुक्तीसाठी जाहिरात रद्द केली.

शिवाय, मोदींनी सार्वजनिक आणि राजकीय दबावाला प्रतिसाद म्हणून ब्रॉडकास्ट बिल, वक्फ बोर्ड बिल आणि दीर्घकालीन भांडवली नफा करावरील इंडेक्सेशन फायदे काढून टाकणे यासह अनेक विधेयके आणि बजेट प्रस्ताव मागे घेतले किंवा सुधारले. उलथापालथाचा हा नमुना नितीश आणि नायडू आणि विरोधी शक्तींचा सरकारी निर्णय आकारण्यात वाढणारा प्रभाव दर्शवितो, भारतातील शासनव्यवस्थेतील आश्चर्यकारक परंतु ताजेतवाने बदल दर्शवितो कारण भाजप आता युती सरकारच्या वास्तवाला सामोरे जात आहे.

नायडूंचा तेलुगू देसम पक्ष (टीडीपी) आणि नितीशचा जनता दल-युनायटेड (जेडी(यू)) हे मोदींसाठी अपरिहार्य युती भागीदार म्हणून उदयास आले, ज्यांनी भाजपचे एनडीए सरकार बनवण्याची किंवा तोडण्याची शक्ती धारण केली - एक नितीश-नायडू अवलंबित युती, ज्याने स्पष्ट केले आहे.निसर्गाने अविश्वसनीय, नितीश आणि नायडू मोदी सरकारच्या अलीकडच्या मागे जाण्याचे श्रेय घेऊ शकतात. या युती सरकारमधील या किंगमेकर्सचे महत्त्व आणि फायदा निर्विवाद आहे, जे एनडीए, भाजप आणि खुद्द मोदी यांच्या विरोधात भूतकाळात राजकीयदृष्ट्या कसे झुकले होते, असा प्रश्न निर्माण होतो.

नितीश कुमार यांच्या निष्ठेत वारंवार बदल होत आहेत,ज्या राजकीय परिदृश्यात सातत्य महत्त्वाचे आहे, त्या पक्षावर मोदी किती विसंबून राहू शकतात, ज्याने युतीच्या हितापेक्षा स्वत:च्या हितानुसार बाजू बदलण्याची तयारी दाखवली आहे? शिवाय, नवीन युती सरकारच्या स्थिरतेसाठी आणि सामर्थ्यासाठी, तसेच युतीमध्ये सत्ता एकत्रित करण्याच्या भाजपच्या क्षमतेसाठी जेडी(यू) च्या राजकीय द्विधातेचा अर्थ काय आहे?

### व्यंगचित्रे




### सुविचार

मार्ग जर अडचणींचा वाटत असेल तर,
साध्य केलेल ध्येय हे त्याहून आधिक सुंदर असेल.

### सण परंपरा

## बैल पोळा


भारतातील विविध राज्यांत साजरा केला जातो बैल पोळाः

बैलपोळा सण श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्येच्या दिवशी साजरा केला जातो. यंदा १४ सप्टेंबर रोजी हा सण साजरा करण्यात येत आहे. बैलपोळा हा विशेषतः विदर्भात भव्य पातळीवर साजरा केला जातो, विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्य प्रदेश व तेलंगण सीमाभागात सुद्धा हा सण साजरा होतो. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा हा सण साजरा केला जातो.

भारतातील 'या' राज्यात साजरा केला जातो बैल पोळाः

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बैलपोळा सण साजरा केला जात असून मध्यप्रदेश, छत्तीसगडमध्ये देखील शेतकरी वर्ग हा सण साजरा करतो. विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्य प्रदेश व तेलंगण सीमांध्र भागात देखील पोळा साजरा केला जातो. पोळ्याच्या दिवशी ज्यांच्याकडे बैल नाहीत ते मातीच्या बैलांची पूजा करतात. तेलंगणाच्या उत्तरेकडे भागात बैलपोळा सणाला पुलाला अमावस्या म्हटले जाते. तर काही ठिकाणी 'बेंदूर' असे देखील म्हणतात. तर दक्षिणेत या सणाला 'पोंगल' आणि उत्तर व पश्चिम भारतात 'गोधन' असे म्हटले जाते.

काय आहे बैल पोळ्याचे महत्त्व?




बैलपोळा सण शेतकऱ्यांसाठी अंत्यत उत्साहाचा असतो. शेती हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात बैलांवर अवलंबून आहे. त्यामुळे बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा ग्रामीण भागातील लोक पोळा साजरा करतात. या दिवशी बैलाची पूजा करून गावभर त्याची वाजतगाजत मिरवणूक काढली जाते. गावात मिरवणूक झाल्यानंतर घरी महिला बैलांची पूजा करतात. काही ठिकाणी मातीच्या बैलांची पूजा करून पूजा करतात. या दिवशी गोड-धोड नैवेद्य बैलांना खाण्यासाठी ठोंबरा, पुरणपोळी, कढी, भजे यासारखे वेगवेगळे पदार्थ बनवतात.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# भुयारी गटार योजनेच्या कामामुळे अंतर्गत रस्त्याची झाली वाताहात



सांगोला : भुयारी गटार योजनेच्या पाईप गाडण्यासाठी डांबरीकरण रस्त्यावर खोदलेल्या चाऱ्यांमुळे सांगोला शहरातंर्गत उपनगरातील डांबरीकरण रस्त्यांची मोठ्या प्रमाणात वाताहात झाली आहे.

पाईप गाडल्यानंतर उखडलेला रस्ता व्यवस्थित बुजविला जात नसल्यामुळे खड्डेमय व चिखलमय रस्त्यावरून चालताना नागरिक, अबालवृद्ध, महिला, शालेय विद्यार्थ्यांना तारेवरची कसरत करूनच चालावे लागत आहे .रस्त्यावर अस्ताव्यस्त पडलेला मुरूम चाऱ्यात बुजवून ठेकेदारांनी रस्ते सुरळीत करावेत, अशी मागणी उपनगरातील महिला, नागरिकांतून होत आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडूनआ.शहाजीबापू पाटील यांच्या मागणीवरून सांगोला शहर व उपनगरात महत्वकांक्षी भुयारी गटार योजना मल: निस्सारण योजनेच्यापहिल्या टप्प्यातील सुमारे ९६.६३ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. पुणे येथील व्हिस्टाकोर इन्फ्राप्रोजेक्टस एजन्सी मार्फत ११ मार्च २०२४ पासून सांगोला शहरांतर्गत उपनगरातील रोडच्या खालून भुयारी गटार योजनेच्या पाईप गाडून ठिकठिकाणी चेंबर बांधण्याची कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत दरम्यान जीसीपी पोकलेन मशीन , जेसीबी यंत्राच्या सहाय्याने उपनगरातील डांबरीकरण व मुरुमीकरण रस्ते मध्यभागातून चाऱ्यांची खोदून पाईप गाडली जात असून , मध्यभागी चेंबर बांधले जातात. एकतर यांत्रिकी साह्याने रस्ते खोदून नंतर खोदलेल्या चाऱ्या व्यवस्थित बुजवल्या जात नाहीत त्यामुळे रस्त्यावर अस्ताव्यस्त पडलेला मुरुम व खड्ड्यातून चालताना उपनगरातील नागरिकांची वाट अक्षरशा खडतर झाली आहे. अशात सध्या पाऊस चालू असल्यामुळे चिखलमय रस्त्यावर दुचाकी, चार चाकी गाड्या रुतून बसतात तर अबालवृद्ध, महिला, शालेय विद्यार्थ्यांना चिखलमय रस्त्यावरून चालताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. उपनगरातील रस्त्यावरून चालताना हा त्रास नित्याचाच होऊ लागल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

मुख्याधिकारी तथा प्रशासक सुधीर गवळी यांनी लक्ष घालून चाऱ्या खोदण्यासाठी उखडलेले रस्ते व्यवस्थित बुजवून उपनगरातील रस्ते सुरळीत करावेत अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेच्या माध्यमातून दुष्काळी मातीतल्या असंख्य खेळाडूंना त्याचबरोबर खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे : खासदार धैर्यशील मोहिते पाटील

सांगोला : आपल्या भारतीय संस्कृतीत खेळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे खेळाच्या माध्यमातून जगणं सुंदर होत आहे. गेली ४२ वर्ष समृद्ध परंपरा जपत राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेच्या माध्यमातून या दुष्काळी मातीतल्या असंख्य खेळाडूंना त्याचबरोबर राज्यातून परराज्यातून आलेल्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे. विद्यार्थी मित्रांनो जेवढं अभ्यासाला महत्त्व तेवढेच खेळालाही महत्त्व द्या. शालेय जीवनात मैदानावर असणाऱ्या विविध प्रकारच्या खेळाच्या संधी वाया घालवु नका. जो युवक आपल्या शालेय जीवनापासूनच मैदानाशी मैत्री करतो तो जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर कधीही हताश होत नाही निराश होत नाही म्हणूनच शालेय जीवनापासूनच मैदानाशी मैत्री करा असे प्रतिपादन माढा लोकसभेचे नवनिर्वाचित खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी




केले. सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, थोर स्वातंत्र्यसेनानी, देशभक्त, कै. गुरुवर्य चं. वि. तथा बापूसाहेब झपके ४३ वा.स्मृतीसमारोह पुरूषांच्या निमंत्रित राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचा उद्घाटन समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके,उपविभागीय पोलिस अधिकारी मंगळवेढा विक्रांत गायकवाड, पुरोगामी युवक संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.बाबासाहेब देशमुख, सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, पंढरपूर तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, सांगोला तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे बास्केटबॉल च्युअर असो.सचिव एम.शेफी, वनाधिकारी इंगोले मॅडम, सां.ता.उच्च शिक्षण मंडख अध्यक्ष बाबुराव गायकवाड,सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडख कार्यकारिणी सदस्य विशेश झपके, संस्था पदाधिकारी, देणगीदार,प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास प्रमुख पाहुणे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचे हस्ते पुष्पहार समर्पित करण्यात आला. त्यानंतर उद्घाटन समारंभामध्ये सुरुवातीला हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंदसिंग यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले .त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थित मैदानाचे विधिवत पूजन करून, श्रीफळ वाढवून उद्घाटन संपन्न झाले.

पुढे बोलताना मोहिते-पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यात सांगोला अकलूज व सोलापूर या तीन ठिकाणी बास्केटबॉलचे ग्राउंड आहेत. शाळेत असणाऱ्या क्रीडा शिक्षकांच्या पाठीमागे संस्थेने उभा राहिले तर निश्चितपणाने मैदानावरून असंख्य खेळाडू घडतील.असे सांगत स्पोर्ट्सच्या माध्यमातून विविध पदांवर विराजमान खेळाडूंची उदाहरणे देत खेलो इंडिया या भारत सरकारच्या महत्त्वकांक्षी योजनांचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना झाला पाहिजे असा मानस व्यक्त केला.

प्रास्ताविकात संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी गेली ४२ वर्ष आयोजन, प्रत्येक वर्षी खेळाडूंचा वाढणारा उत्साह, क्रीडा व युवक कल्याण मंत्री नामदार संजयजी बनसोडे यांनी दिलेल्या अनुदानातून बास्केटबॉलचे मैदान पुढील वर्षी बंदिस्त होणार असे सांगत पुढच्या वर्षीचे सामने इनडोअर स्टेडियम मध्ये होतील असा विशास व्यक्त करत उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा.धनाजी चव्हाण, यांनी केले तर प्राचार्य अमोल गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले.

# सांगोला शहरातील शिवस्मारकाचा प्रश्न लवकरच सुटणार खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दिल्या जिल्हाधिकारी यांना सूचना

सांगोला : सांगोल्यातील शिवस्मारकाच्या परवानगीसाठी २१ तारखेला जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा झाली आहे. लवकरात लवकर बैठक लावून स्मारक समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना बोलवून तांत्रिक बाबी विषयी चर्चा करुन छ.शिवाजी महाराज यांचे स्मारक लवकरात लवकर उभे राहावे, यादृष्टीकोनातून जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या असून शिवस्मारकाचा प्रश्न सुटुन लवकरात लवकर आनंदाची बातमी मिळेल, असा विश्वास खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केला.

सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाची खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी शुक्रवार दि.३० ऑगस्ट रोजी पाहणी केली. यावेळी डॉ.बाबासाहेब देशमुख, बाबुराव गायकवाड, अरविंद केदार, इंजि.रमेश जाधव, महेश नलवडे यांच्यासह शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अरविंद केदार व इंजि. रमेश जाधव यांनी स्मारकासंबंधीची माहिती खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांना सांगितली. यावेळी शिवप्रेमी संस्थेकडून खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

# सांगोला एसटी स्टँड परिसरात निर्भया पथकाची धडक कारवाई

सांगोला :सांगोला बसस्थानकावर रोडरोमियोची धरपकड करून ९ ते १० जणांवर सपोनि रूपाली उबाळे यांनी कारवाई केल्याने विद्यार्थिनी व महीलाकडून समाधान व्यक्त केले जात आहे. सांगोला शहरात ग्रामीण भागातून शिक्षणा निमित्त दररोज हजारो मुली एसटीने ये जा करतात यां मुलींना शहर परिसरातील रोड रोमियो कडून नाहक त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी पोलिसांना प्राप्त झाल्या होत्या त्या अनुषंगाने पोनी. भिमराव खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि रूपाली उबाळे मॅडम, पोकॉ.शिंदे, चालक खटकाळे व होमगार्ड यांच्या पथकाने सोमवार दि.२६ रोजी दुपारी साडेबारा वाजता एसटी स्टँड परिसरात धडक कारवाई करून ९ ते १० रोड रोमियोना पोलिस ठाण्यात आणून महाराष्ट्र पोलीस अधिनियम ११०,११७ अन्वये कारवाई करून समज देण्यात आली यां कारवाई मुळे विद्यार्थिनी कडून समाधान व्यक्त केले जात आहे.

सांगोला शहरातील डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालयात सपोनि रूपाली उबाळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना कायद्याची प्राथमिक माहिती देवून विद्यार्थ्यांच्या अडी अडचणी जाणून घेऊन महिला आणि तरुणींना त्यांच्या सुरक्षितता आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करुन देणे आणि पुरुषांना त्यांचे कृत्य अपराध असल्याबाबत किंवा त्याचे परिणाम, शिक्षा याची माहिती निर्भया पथकामार्फत प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले, कोणीही कायदा हातात न घेता मुलींना त्रास होईल असे कृत्य करू नये असे बजावले. मुलींनी आपल्यावर झालेल्या अन्याया बाबत जागरूक राहणे गरजेचे असल्याचे सांगून ही कारवाई दररोज केली जाईल असे उबाळे यांनी सांगितले.

# सांगोला नगर परिषदेची पाच मजली इमारत १५ कोटींतून साकारली जाणार
## ब्रिटिशकालीन इमारत पाडून नूतनीकरण, आधुनिक सुविधा मिळणार

सांगोला: एकेकाळी शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या नगर परिषदेच्या जुन्या प्रशासकीय इमारतीचे २४ ऑगस्ट रोजी पाडकाम सुरू झाले. नव्याने पाच मजली वातानुकुलित प्रशासकीय इमारत उभारले जाणार आहे. शासनाने या इमारतीसाठी १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. ब्रिटिशकालीन इमारत अपुरी पडू लागल्याने १९७९ मध्ये २.७४ लाख रुपये खर्चुन सांगोला नगर परिषद उभारली होती.




१९७४ ते १९७९ या कालावधीत पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष ॲड. पृथ्वीराज चव्हाण यांनी पूर्वीच्या मंडई जवळील वेशीवर असलेली ब्रिटिश कालीन नगर परिषद कार्यालयाची इमारत अपुरी पडत असल्याने १९७८ मध्ये नगर परिषदेचे बांधकाम केले होते. भविष्यकाळात पाच मजली इमारत बांधता यावी या दृष्टीने पाया घेतला होता. दरवाजे सागवानी लाकूडाचे होते. इमारतीवर घड्याळ होते. विकासाचा कारभार येथून चालू होता. १९९५ मध्ये दुसरा मजला बांधला होता. २००४ साली सुभाष देशमुख यांच्या आमदार फंडातून तिसरा मजला बांधला गेला होता, असे मुख्याधिकारी सुधीर गवळी यांनी सांगितले.

२४ ऑगस्ट २०२४ रोजी जमीन दोस्त केली. १५ ऑगस्ट १९७९ साली नगर परिषद इमारतीचे लोकार्पण झाले होते. गेली ४५ वर्षे नागरी जुनी इमारत जीर्ण झाल्याने नवीन वास्तूची उभारणी इमारतीचे आयुष्य चाळीस वर्षांचे असेल.

<u>अशी असेल नवीन इमारत– वैभवशाली नवीन</u>

तळमजला –पार्किंग,
पहिला– सुविधा केंद्रे,
दुसरा– पाणीपुरवठा, कर विभाग,
तिसरा– आस्थापना, बांधकाम, नगर रचना, विद्युत,
चौथा–पाचवा–मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष,विषय समिती सभापतींची दालने,
पाचवा–सर्वसाधारण सभेचे सभागृह

जुनी नगर परिषदेची प्रशासकीय इमारत जीर्ण झाली होती. तीस वर्षापेक्षा जास्त इमारतीची लाइफ नसल्याचे व स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये ही इमारत धोकादायक असल्याचा मुद्दा उपस्थित होता. तेथे नागरिक, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका असल्याने शेजारील प्रशासकीय इमारतीत कामकाज चालू होते.

– अविराज डिंगणे, नगर अभियंता, सांगोला.

# छत्रपती शिवराय व महापुरुषांची वारंवार होणारी विटंबना थांबवावी

सांगोला : छत्रपती शिवराय व महापुरुषांची वारंवार होणारी विटंबना थांबवावी अशी मागणी सकल मराठा समाज सांगोला यांचेकडून तहसीलदार यांचेकडे गुरुवार दि.२९ ऑगस्ट रोजी निवेदनाव्दारे करण्यात आली. यावेळी गेल्या आठ महिन्यापूर्वी राजकोट मालवण येथे उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचे पूर्णाकृती स्मारक कोसळले गेले. साडेतीनशे चारशे वर्षापूर्वी उभारलेले महाराजांचे किल्ले हे अखंड विशाचे प्रेरणा स्त्रोत असताना काही घाई गडबडीत चुकीच्या पद्धतीने स्मारकाचे उद्घाटन करून व अवघ्या आठच महिन्यात सदर स्मारक कोसळले, या घटनेतील सर्व संबंधितांना सखोल चौकशीकरून कठोरशासन करावे., त्याच ठिकाणी योग्य तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली भव्य स्मारकाची पुन्हा निर्मिती करावी., त्याचबरोबरबदलापूर कोल्हापूर येथील महिला मुलींवर अमानुष अत्याचार करणाऱ्या नराधम आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे., महाराष्ट्रातील इतर शहरांमध्ये होत असलेले महिला वरील अत्याचार थांबवण्यासाठी निर्भया पथक पूर्ण क्षमतेनेकार्यरत करावे., महिला वरील अत्याचाराचे गुन्हे ताबडतोब निकाली काढण्यासाठी फास्टट्रॅक कोर्टामध्ये गुन्हे चालवावे. अन्यथा सामान्य जनता रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही त्याची सर्व जबाबदारी शासनकर्त्यांची राहील असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदर निवेदन देतेप्रसंगी बाबुराव गायकवाड, तानाजीकाका पाटील, अरविंद केदार, इंजि.रमेश जाधव, डॉ.पियुषदादा साळुंखे–पाटील, वैभव केदार, बाळासाहेब शिंदे, बापूसाहेब ठोकळे, धनंजय भाकरे, माऊली गायकवाड, विजय पवार, पिंटू पाटील, धनंजय पवार, सुर्याजी खटकाळे, दिलीप जानकर, प्रताप इंगोले, भारत साळुंखे, राजू मदने, धनंजय ढेकळे,



विशाल केदार यांच्यासह शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री महाराष्ट्र, जिल्हाधिकारी सोलापूर, जिल्हा पोलीस अधिक्षक सोलापूर, पोलीस अधिक्षक सोलापूर यांना देण्यात आल्या आहेत.